Guru Vishwambharkrupa Bahuuddeshiya Shikshan Prasarak Mandal Lakkadjawalga's

# SHIVNERI MAHAVIDYALAYA,

## Shirur Anantpal, Dist. Latur- 413544

(NAAC Accredited $B^{+}$ Grade with 2.54 (CGPA)

# Report on Extension Activities
# 2021-22

By

## Department of
## National Service Scheme (NSS)

## Report on Extension Activities (2021-22)

------------------------------------------------------------------------------------------------------

Shivneri Mahavidyalaya Shirur Anantpal has a functional National Service Scheme (NSS) unit which is consistently engaged in social outreach activities through its regular and special camps as per university guidelines. The NSS department adopted a neighborhood village for three consequent years to conduct a various activity regarding community awareness programmes. A unit of 150 students with two programme officers is constantly engaged to work out the designed programmes.

During the year 2021-22 the NSS unit has organized and completed following programmes.

- On 5th June, on the occasion of World Environment Day NSS department carried out a plantation drive in college campus. All teachers and students are actively participated in the programme.
- The Department of Environmental Science has organized a Webinar on ‘Role of Youth in Environment Conservation’ through online mode.
- In order to combat with the outbreak of Covid-19 pandemic the NSS unit in collaboration with the Primary Health Centre, Shirur Anantpal conducted two Vaccination Drive through which 61 peoples were vaccinated.
- The NSS unit has conducted a Blood donation camp in Pandharwadi village of Shirur Anantpal taluka. The camp was conducted in collaboration with Bhalchandra Blood Bank, Latur. In these camps 34 students, teachers and villagers were donated blood.
- The human health checkup was carried out in collaboration with the Primary Health Centre (PHC) Sakol-Shirur Anantpal. About 100 peoples were checked their health and blood.
- Department of NSS organized and conducted an eye checkup camp in collaboration with the Vision Centre Shirur Anantpal and Udayagiri Lions Club, Udgir in Pandharwadi of Shirur Anantpal tahsil. About 130 peoples were checked their eyes through experts’ team.
- In special camp of NSS, the department of NSS organized cattle health checkup camp in collaboration with the Animal Husbandry Department Shirur Anantpal in adopted village Pandharwadi at Shirur Anantpal tahsil. About 85 cattle were checked in this camp.
- On 8th March 2022 the NSS unit organized an *‘International Women’s Day’* to honor the women’s contribution in various field. The programme has received an overwhelming response from 145 girl’s students.
- 




**Plantation activity on the occasion of World Environment Day 5th June, 2021**







**Covid-19 Vaccination Drive through NSS**




**Inauguration of NSS Special Camp by Mr. Atul Jatal, Tahsildar of Shirur Anantpal at Pandharwadi village of Shirur Anantpla Taluka**




**Health Checkup Camp of villagers through PHC Shirur Anantpal**









**Gram Swachhata by NSS volunteers at Pandharwadi village**




**Eye Checkup camp at Pandharwadi village**




**Blood Donation Camp in Pandharwadi village**







**Cattles Health Checkup camp at Pandharwadi village**

# News Clippings of activities conducted in NSS Special Camp at Pandharwadi village of Shirur Anantpal Tehsil

**पुण्य नगरी**

**पुण्य नगरी**

# 'शिवनेरी'च्या विशेष शिबिराचे उद्घाटन

**शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी**

येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष शिबीर पांढरवाडी येथे होत असून, या शिबीराचे उद्घाटन स्वारातीम विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. रमाकांत घाडगे यांच्या हस्ते दि . २३ मार्च रोजी करण्यात आले.

अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव पद्माकर मोगरगे होते. प्रमुख पाहुणे तहसीलदार अतुल जटाळे, संस्थेचे उपाध्यक्ष अॅड सुतेज माने, सरपंच लोकरे, उपसरपंच सतिष शिंदाळकर, चेअरमन अतुल गंभीरे, नंदकुमार तांबोळकर, प्राचार्य डॉ ओमप्रकाश जाधव आदी उपस्थित होते. डॉ. रमाकांत घाडगे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांच्या मनात राष्ट्रभक्ती




निर्माण होऊन, विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लागते. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या आशा शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लक्षात येतात व राष्ट्रभक्तीची बीजे राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनावर रुजली जातात. यावेळी उपस्थिताची भाषणे झाली. प्रास्ताविक प्राचार्य डॉ ओमप्रकाश जाधव यांनी केले. सूत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी प्रा मारोती गायकवाड यांनी केले. आभार कार्यक्रमाधिकारी डॉ अभय बोंडगे यांनी मानले. याप्रसंगी सचिन कोतवाडे, महादेव खटके, भीमाशंकर तांबोळकर, गलबले, गुंडाप्पा तांबोळकर, किशन एरंडे गुरुजी, गावकरी, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि एनएसएस स्वयंसेवक उपस्थित होते.

**Smart Latur**
Page No.4 March 25, 2022

पुरोगामी विचाराचे **एकमत**

page- 6
30 Mar 2022



# पांढरवाडी येथे सर्व रोगनिदान व रक्तदान शिबिर

**शिरूर अनंतपाळ : प्रतिनिधी**

शहरातील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पांढरवाडी येथे सर्वरोग निदान शिबिर व रक्तदान शिबिर घेण्यात आले.यात १०९ जणांची तपासणी करून औषध देण्यात आले व रक्ताचे नमुने घेण्यात आले. तर यावेळी १७ जणांनी रक्तदान केले.

या आरोग्य निदान शिबिरासाठी वैद्यकीय अधिकारी डॉ.निकिता चव्हाण, सीएचओ डॉ. विकास शेटे व डॉ. विकास एकुरगे यांनी तपासणी केली.त्यांच्यासोबत ज्योती हसणे सौ मनीषा मुचळंबे, मीनाताई श्रीमंगले, शिवकन्या लोहार या आरोग्य कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी डॉ.निकिता चव्हाण यांनी मुलींच्या आरोग्य संबधित समस्या व त्यावरील उपाय याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलोफर शेख यांनी केले तर आभार निकिता क्षीरसागर हिने मानले. या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी रासे[illegible] स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थि[illegible] गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# २१ जणांचे रक्तदान

शिरूर अनंतपाळ : येथील शिवनेरी महाविद्यालयाचे पांढरवाडी येथे रासेयो शिबीर सुरु असून, या शिबीरात २१ जणांनी रक्तदान केले.

मराठवाडा साथी

# पांढरवाडी येथे पशुरोगनिदान शिबिरास प्रतिसाद

शिरूर अनंतपाळ (प्रतिनिधी-

येथील शिवनेरी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर पांढरवाडी येथे सुरु आहे. या शिबिरात गावातील गाई, म्हशी, बैल, शेळ्या या मुक्या प्राण्यासाठी



महाविद्यालयाने पशुरोगनिदान आणि उपचार शिबीर आयोजित केले होते. सदरील शिबिरामध्ये 85 पेक्षा जास्त जनावरांचे लाळ्या खुरकूत लसीकरण, बिल्ला मारणे व आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरासाठी तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ गोहलेर डी.एम., सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ.केसाळे डी.बी., पशुधन पर्यवेक्षक डॉ. शेख जी जी, डॉ. कोळी जी.बी., राजू पेठे, पांढरे बी आर, नाळापुरे आदी अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील वसंत गंभीरे, गुंडाप्पा तंबोळकर, (पान 7 वर...)

BEED Edition

## ...पांढरवाडी

रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. अभय बोंडगे, प्रा. मारोती गायकवाड, फिरोज तांबोळी, श्रीकांत नागटिळक आणि रासेयो विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवनेरीचे महाविद्यालयाचे पांढरवाडी येथे सर्व रोगनिदान शिबीर संपन्न

• बाळकडू : राम सुमठाणे
संपर्क.९५२७९४३१३०

**निलंगा (लातूर) :-** शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौ.पांढरवाडी येथे सुरु असलेल्या विशेष शिबिरामध्ये आज सर्वरोग निदान शिबिर घेण्यात आयोजित करण्यात आले होते यामध्ये गावातील १०९ लोकांची तपासणी करून त्यांना गोळ्या देण्यात आल्या




तसेच तसेच रक्ताचे नमुने घेण्यात आले ज्यामध्ये त्यांची शुगर एल एफ टी केएफटी,ॲनिमिया इत्यादी तपासण्या करून अहवाल देण्यात येईल. सदरील आरोग्य निदान शिबिरासाठी येरोळ येथील वैद्यकीय अधिकारी डॉ निकिता चव्हाण तसेच शिरूर अनंतपाळ येथील समुदाय आरोग्य अधिकारी डॉ विकास शेटे व डॉ विकास एकुरगे हे तज्ञ डॉक्टर उपस्थित होते.डॉ चव्हाण यांनी मुलींच्या आरोग्य संबधित समस्या व त्यावरील उपाय या विषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

तसेच सौ ज्योती हसणे, सौ मनीषा मुरंबे, सौ मीनाताई श्रीमंगले, शिवकन्या लोहार इत्यादी कर्मचारी आरोग्य केंद्रातर्फे आले होते.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु शेख निलोफर हिने केले तर आभार कु निकिता क्षीरसागर हिने मानले.या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ अभय बोंडगे, प्रा मारोती गायकवाड, फिरोज तांबोळी, श्रीकांत नागटिळक, चंद्रकांत तांबोळकर, येरंडे, सुगवे, रासेयो स्वंयसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी, गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठवाडा साथी
गुरुवार, दि. 31 मार्च 2022

# राष्ट्रीय सेवा योजनेतून शारीरिक श्रमाबरोबर बौद्धिक धडे मिळतात : डॉ. शोभाताई बेंजरगे

शिरूर अनंतपाळ (प्रतिनिधी-)

येथील शिवनेरी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबाराचा समारोप पांढरवाडी या ठिकाणी झाला. समारोपाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या सदस्या डॉ. शोभाताई बेंजरगे उपस्थित होत्या.



डॉ. बेंजरगे यावेळी बोलत असताना म्हणाल्या की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एनसीसी आणि एनएसएस या योजना महाविद्यालयात राबावल्या जातात. रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक बांदिलकीची जाणीव निर्माण होते. ग्रामीण भागात जाऊन ग्रामीण भागातील समस्या त्यांना जवळून पाहता येतात. विद्यार्थीना वेगवेगळ्या प्रकल्पाच्या माध्यमातून शारीरिक श्रमकरण्याची सवय त्यांना लागते. तसेच अशा शिबिरातून बौद्धिक धडेही दिले जातात. राष्ट्रीय एकात्मता जपली जाते. खास करून (पान 7 वर...)

## ...राष्ट्रीय सेवा

मुलींनी शिक्षण घेऊन आन्याला वाचा फोडली पाहिजे. समारोप कार्यक्रमाचे आध्यक्ष प्राचार्य डॉ. ओमप्रकाश जाधव यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची सुरुवात, उद्देश, बोधवाक्य या संदर्भात भाष्य केले. याप्रसंगी गावातील जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक एरंडे गुरुजी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन कार्यक्रमाधिकारी प्रा. मारोती गायकवाड यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. अभय बोंडगे यांनी मानले. व्यासपीठावर महादेव खटके, गुंडाप्पा तांबोळकर उपस्थित होते. समारोपाच्या कर्यक्रमाला श्रीकांत नागटिळक, फिरोज तांबोळी यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

पुण्य नगरी

# शिवनेरी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा समारोप



शिरूर अनंतपाळ / प्रतिनिधी

येथील शिवनेरी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबाराचा समारोप पांढरवाडी या ठिकाणी झाला. समारोपाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्राच्या महिला आयोगाच्या सदस्या डॉ. शोभा बेंजरगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. बेंजरगे म्हणाल्या की, रासेयोच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना सामाजिक बांदिलकीची जाणीव निर्माण होते. ग्रामीण भागात जाऊन ग्रामीण भागातील समस्या त्यांना जवळून पाहता येतात. विद्यार्थीना वेगवेगळ्या प्रकल्पाच्या माध्यमातून शारीरिक श्रम करण्याची सवय लागते. तसेच आशा शिबिरातुन बौद्धिक धडेही दिले जातात. राष्ट्रीय एकात्मता जोपसली जाते. खास करून मुलींनी शिक्षण घेऊन आन्याला वाचा फोडली पाहिजे. असे डॉ . शोभा बेंजरंगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ओमप्रकाश जाधव हे होते. तर प्रमुख पाहुणे डॉ. शोभाताई बेंजरंगे एरंडे गुरुजी गुंडाप्पा तांबोळकर महादेव खटके यांची प्रमुख उपस्थीती होती. या[illegible] एरंडे गुरुजी यांनीही मनोगत [illegible] केले. सूत्रसंचलन कार्यकामाधीकारी प्रा. मारोती गायकवाड यां[illegible] तर आभार डॉ. अभय बोंडगे यांनी मानले.

Smart Latur
Page No.3 April 03, 2022